MHRG110003172024

## नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०२४ मधील निशाणी क्र. १२ वर आदेश
## (पारीत दिनांक १०.०५.२०२४)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी सादर करुन पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

२. वादी यांनी अर्जात नमुद केले की, दावामिळकतीमध्ये वादी यांना राहण्यास प्रतिवादी मज्ञाव करीत आहेत. दावामिळकतीमध्ये वादी नियमित राहत होते व आहेत. आज रोजी वादी हे परदेशात असुन वादी मौजे साई येथे आल्यावर त्यांना राहण्यास कोणतेही घर नाही. तरी सदर दाव्याकामी पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी यांनी वादी यांना दावामिळकतीमध्ये राहण्यास मज्ञाव करु नये असा आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले. त्यांनी नमुद केले की, दावामिळकतीमध्ये त्यांच्या भावाला पुढील तारखेपर्यंत राहण्यास हरकत करणार नाही.

४. येथे सर्व प्रथम नमुद करणे महत्वाचे आहे की, प्रस्तुतचा दावा हा मनाई हुकुमासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा दिनांक २०.०४.२०२४ रोजी दाखल करण्यात आला असुन प्रतिवादी आज रोजी दाव्याकामी हजर झाले आहेत. वादीच्या कथनांनुसार, दावामिळकत वादी व प्रतिवादी यांची सामाईक मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील आहे. प्रस्तुतचा अर्ज सादर करुन वादीने नमुद केले की, प्रतिवादी

त्यांना दावामिळकतीमध्ये राहण्यास मज्ज्ञाव करीत आहे. दावामिळकती व्यतिरिक्त त्यांना राहण्यास दुसरे घर नाही. दिवाणी न्यायालयाला दिनांक १३.०५.२०२४ पासुन ते दिनांक १०.०६.२०२४ रोजीपर्यंत उन्हाळी सुट्टी आहे. प्रतिवादी यांनी वादीला दावामिळकतीमध्ये पुढील तारखेपर्यंत राहण्यास हरकत केलेली नाही. दावामिळकतीचा ताबा नेमका कोणाकडे आहे ही बाब उभयपक्षकारांच्या पुराव्याअंती सिध्द होईल.

५. परंतु, दाव्याचे स्वरुप, अर्जातील कथन व वादीचे म्हणणे विचारात घेता, पुढील तारखेपर्यंत वादीला दावामिळकतीमध्ये राहण्याची मुभा देणे योग्य व रास्त होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. १२ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादीला दिनांक १०.०६.२०२४ रोजीपर्यंत दावामिळकत घर क्रमांक २८७ मध्ये राहण्याची मुभा देण्यात येते. प्रतिवादीने वादी सदर घरात दिनांक १०.०६.२०२४ रोजीपर्यंत राहण्यास हरकत/मज्ज्ञाव करु नये. |

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2024.05.10 15:39:16 +0530

माणगांव, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – १०.०५.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव